महासागर नागपूर

ऑरेंज सिटी

पान ३

सोमवार, दिनांक ०५ सप्टेंबर २०२२

कच्च्या मालावर जीएसटी तर सर्व पुस्तकांच्या किमती ५०% वाढणार!

नागपूर ०४ सप्टेंबर: कच्च्या मालाचे वाढलेले दर त्यामुळे कागदाच्या वाढलेल्या किमती, सरकारने लावलेला जीएसटी , सोबतच महागाईने वाढलेल्या किमतीमुळे पुस्तकांच्या किमतीत मोठी वाढ होणार असल्याचे चित्र आहे. यावर्षी शालेय पुस्तकांच्या व वह्यांच्या किमतीत वाढ झाल्याचे समोर आले होते. आता सरकारने ग्रंथनिर्मितीच्या प्रत्येक विभागाला १८% जीएसटी लावल्याने सर्वच प्रकारच्या पुस्तकांच्या किमतीत ५०% पर्यंत वाढ होणार असल्याचे मानले जात आहे. दुसरीकडे तयार पुस्तक ग्राहकाला देताना करमुक्त द्यावे लागते. त्यामुळे वाढीव खर्चाचा ताण अपरिहार्यपणे पुस्तकांच्या किमती वाढण्यावर होणार आहे. ही वाढ सुमारे ५०% असू शकते आणि येत्या सप्टेंबरपासून ती प्रत्यक्षात येणार आहे.

राज्यभरात १००० हून अधिक प्रकाशक आहेत. प्रकाशक संघाच्या सभासदांची संख्याच ४६५ आहे. प्रत्येक प्रकाशक वर्षाला सरासरी १० ते १२ पुस्तके छापतात. मात्र, एकीकडे ऑनलाइनमुळे मंदावलेली मागणी आणि दुसरीकडे कागदाच्या किमतीतील वाढ, जीएसटी यामुळे वाढलेला निर्मिती खर्च या कात्रीत प्रकाशन संस्था सापडल्या आहेत.

पुस्तकांच्या एका पानाचा खर्च १.२५ ते १.५० रुपया येत होता. तो सध्या २ ते २.२५ रुपये प्रतिपान असा वाढला आहे. यामागे कागदाच्या किमतीत झालेली वाढ आणि पेट्रोलच्या दरात झालेली वाढ ही कारणे असल्याचे प्रकाशकांनी सांगितले. याशिवाय पुस्तकनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या खर्चावर जीएसटी अनिवार्य आहे. पण छापील पुस्तक ग्राहकाला विकताना मात्र करमुक्तच विकावे लागते, असा तिढा आहे.

सदृढ लोकशाही निर्माण करण्याचे दायित्व वकिलीं व्यवसायाकडे : सरन्यायाधीश उदय लळीत

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठात सरन्यायाधीशांचा हृद्य सत्कार

नागपूर ०४ सप्टेंबर: मनुष्याने केलेली कुठलीही कृती, वागणूक यासंदर्भात न्याय देण्याची शक्ती समाजाने न्यायाधीशांना प्रदान केली आहे. या शक्तीच्या भरवश्यावर न्यायाधीश कायद्याच्या अंमलबजावणीतून सदृढ लोकशाहीचे निर्माण करु शकतात. त्यामुळे कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी न्यायिक क्षेत्राला प्रबळ व्यवसाय म्हणून पहावे, असे प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश उदय लळीत यांनी आज येथे केले. वारंगास्थित महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाव्दारे न्यायमूर्ती श्री. लळीत यांचा सत्कार करण्यात आला. त्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित सरन्यायाधीशांच्या सत्कार समारंभाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, सरन्यायधिशांच्या सुविद्य पत्नी अमिता लळीत, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दिपांकर दत्तो, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती सुनील शुक्रे, न्यायमूर्ती प्रसन्ना वऱ्हाडे, न्यायमूर्ती अतुल चांदुरकर, न्यायमूर्ती अनिल किलोर, सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. विजेंदर कुमार आदी व्यासपीठावर उपस्थिती होते. तसेच विद्यापीठाचे विधी अभ्यासक्रमाचे शिक्षकवृंद विद्यार्थी-विद्यार्थीनीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती श्री. लळीत म्हणाले, शासकीय विधी महाविद्यालयात शिकत असताना त्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून तसेच विधीतज्ज्ञांच्या अनुभवशील ज्ञानाव्दारे कायद्याचे शिक्षण अवगत करावे लागत असे. त्यांना शिकविणारे शिक्षक हे मुळातच वकील म्हणून न्यायालयात खटले लढत असायचे. त्याकाळी कायद्याचे शिक्षण घेत असताना प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहून विविध खटले व न्यायाधीशांच्या निर्णयांचा अभ्यास करुनच अभ्यासक्रम पूर्ण करावा लागत असे. आपल्या देशाला कायदेपंडीतांचा मोठा इतिहास लाभला आहे. वकीलांनाच समाजातील गरीबांच्या कायदेशीर समस्या, सामाजिक समस्या, संविधानिक मुद्दे सोडविण्याचे भाग्य असल्यामुळे पूर्वीच्या काळात वकीली याच पेश्यात अधिकांची ओढ होती. सामाजाला पडणारे अनेक प्रश्न सोडण्यासाठी वकील हाच योग्य पर्याय आहे. आताच्या सद्यस्थितीमध्ये सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय दोन्ही न्यायपालिकेत वकीलांची संख्या घटताना दिसून आली आहे, असे त्यांनी सांगितले. येथील नामांकित राष्ट्रीय विधी विद्यापीठात सर्व सोयीयुक्त वातावरणात कायद्याचे शिक्षण घेत असल्याने आपण नशीबवान आहात. याठिकाणी कायद्यासंदर्भातील कायदेतज्ज्ञांकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे. विधी क्षेत्राचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांनी न्यायदानाच्या क्षेत्राला प्रबळ व्यवसाय म्हणून पहावे. कारण याच व्यवसायाच्या माध्यमातून आपण समाजाला अपायकारक असणाऱ्या अनिष्ट घडामोडींना आळा घालू शकतो. न्यायपालिकेवर विश्वास असणाऱ्या समाजातील गरजूंना आपण या व्यवसायाच्या माध्यमातून न्याय मिळवून देऊ शकतो, असे सरन्यायाधीश श्री. लळीत म्हणाले.

न्यायिक क्षेत्रात पिरॅमिडसारखी निर्माण झालेली परिस्थिती बदलविण्यासाठी विधी क्षेत्रातील तरुणांनी आव्हान स्वीकारुन आपल्या गुणवत्तेच्या जोरावर न्यायपालिकेत आपले स्थान काबिज करावे. नागरी सेवा उत्तीर्ण करण्यासाठी कित्येक तरुण ज्याप्रमाणे जिद्दीने परिश्रम करतात त्याचप्रमाणे कायद्याचे शिक्षण घेणाऱ्यांनी सुध्दा न्यायमूर्ती पदांच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी परीश्रम करावेत. न्यायिक सेवा मध्ये प्रवेश घेऊईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विधी महाविद्यालयात शास्त्रोक्त अभ्यासक्रम, न्यायिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण व पात्रता परीक्षा असे तीन टप्पे असावेत, असेही सरन्यायाधीश श्री. लळीत यांनी सांगितले. यावेळी सरन्यायाधीशांनी विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्यांच्या उज्वल भविष्य, करिअरसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजेंदर कुमार यांच्या हस्ते सरन्यायाधीश उदय लळीत व त्यांच्या सुविद्य पत्नी अमिता लळीत यांचे शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सरन्यायाधीश श्री. लळीत यांनी विद्यापीठाच्या शिकवणीवर्ग, वास्तूची पाहणी केली. सत्कार समारंभात कुलगुरु विजेंदर कुमार यांनी विद्यापीठात सुरु असलेले विधी अभ्यासक्रम, आधुनिक तंत्रज्ञान, सोयी-सुविधा, विद्यार्थी क्षमता आदी संदर्भात प्रास्ताविकातून माहिती दिली तर निबंधक आशिष दिक्षीत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पावसामुळे ब्रिटिशकालीन पूल खचला

मनपाकडे हस्तांतरीत केल्यावर देखभालीची दखलच नाही

नागपूर ०४ सप्टेंबर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयासमोरील १९६० मध्ये बांधलेला पूल पावसामुळे वाहून गेल्याने या पूलाची दुरवस्था झाली. महापालिकेने या पूलाच्या नूतनीकरणासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली असून कार्यादिश देण्यात आल्यानंतर पुलाचे बांधकाम १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान असणार आहे. या नवीन पुलाच्या बांधकामासाठी मनपाने ८ कोटींची तरतूद केली आहे. निविदा प्रक्रिया अद्याप प्राथमिक टप्प्यात असून त्यास अंतिम स्वरुप देत कामाचे कार्यादिश देण्यात येणार आहे. यापूर्वी हा पूल नासुप्रने बांधला होता. त्यानंतर हा पूल मनपाकडे हस्तांतरित करण्यात आला होता. मात्र पुलाच्या देखभालीची मनपाने कोणतीही दखल घेतली नव्हती.

मनपाच्या ढिसाळ नियोजनामुळे अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहे. मोक्षधाम घाटाजवळ बांधण्यात आलेल्या पूलासाठी १८ महिन्याऐवजी ५ वर्षे लागली. तसेच झिरो माईल मेट्रो स्टेशनजवळील डीपी रस्ता तयार करण्यासाठी मनपाला ६ वर्षे लागली आहे. याशिवाय महाराजबागेतून जाणाऱ्या रस्त्यावर पूल बांधण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. या पुलासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आल्या होत्या.

याशिवाय विद्यापीठ ग्रंथालय चौक ते रामदासपेठच्या सेंट्रल बाजार रोडपर्यंत सिमेंट रस्ता तयार करण्यात आला. यापूर्वी अनेक लोकप्रतीनिधींनी मनपा प्रशासनाकडे सिमेंट रस्त्यासह जुना व जीर्ण पूल बांधण्याची मागणी केली होती. निधीअभावी प्रशासनाने केवळ सिमेंट रस्ता तयार करून पूल तसाच ठेवला. धरमपेठ झोनचे सहाय्यक आयुक्त प्रकाश वराडे यांनाही पुलाच्या जीर्ण अवस्थेबाबत दुर्लक्ष केले होते हे विशेष. मात्र सुदैवाने पुल खचत असताना कुठलाही मोठा अपघात घडला नाही. मात्र ज्या पद्धतीने पूल खचला आहे, जर वर्दळीच्या वेळी हा पूल खचला असता तर मनपाला देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणे अंगाशी आले असते हे निश्चितच.

वर्गमित्राकडून विद्यार्थिनी गर्भवती ; गुन्हा दाखल

नागपूर ०४ सप्टेंबर: कराटेचे प्रशिक्षण घेताना झालेल्या मैत्रीतून १७ वर्षाच्या मुलाने १६ वर्षीय मुलीशी शारीरिक संबंध प्रस्तापित केले. ती मुलगी चार महिन्यांची गर्भवती झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी जरीपटका पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. जरीपटक्यात राहणारी १६ वर्षीय मुलगी दहावीची विद्यार्थिनी आहे. ती कराटे क्लासला जात होती. त्याच प्रशिक्षण केंद्रात सराव करणारा १७ वर्षीय आरोपी मुलाने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले.

सप्टेंबर २०२१ मध्ये तिला अंबाझरीतील एका मित्राच्या घरी नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले होते. त्यानंतर ती गर्भवती झाली. विचारणा केली असता मुलीने प्रियकराचे नाव सांगितले. जरीपटका पोलिसांनी मुलीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

परतीच्या पावसाने विदर्भाला झोडपले ; हवामान खात्याच्या अंदाजाचे पुन्हा धिंडवडे



नागपूर ०४ सप्टेंबर: दहा दिवसांच्या विश्रांतीनंतर परतीच्या पावसाने उपराजधानीसह संपूर्ण विदर्भात प्रवेश केला आहे. शनिवारी दुपारपासूनच अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसाला सुरुवात झाली. हवामान खात्याने सात -आठ तारखेपासून परतीच्या पावसाचा इशारा दिला होता. मात्र, तो खोटा ठरवत खासगी हवामान केंद्रांनी दिलेला अंदाज खरा ठरला.

नागपुरात रविवारी सकाळपासून संथ पावसाला सुरुवात झाली, पण नंतर पावसाचा वेग वाढला. यवतमाळ जिल्ह्यात देखील मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. अमरावती जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. वर्धा, गोंदिया, अकोला भंडारा, जिल्ह्यात संततधार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात देखील रविवारी सकाळपासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसाने विदर्भात पूरस्थिती उद्भवली होती.

क्राईम कॉर्नर

१५ वर्षीय बालिकेची आत्महत्या

नागपूर ०४ सप्टेंबर: पाचपावली ठाण्यांतर्गत एका १५ वर्षीय बालिकेने राहते घरी गळफास लावून आत्महत्या केली. सोनू आकाश गौर (१५) रा. शोभाखेत असे मृत बालिकेचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सोनूने राहते घरी छताच्या बल्लीला ओढनी बांधून गळफास लावला. सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास आई नीतूने तिला गळफास लावलेल्या अवस्थेत पाहून पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना केला. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. गत काही दिवसांपासून सोनूचा स्वभाव बदलला होता. ती लहान-लहानशा गोष्टींवर चिडचिड करीत होती, मात्र याचे कारण समजले नाही, असे पोलिस चौकशीत आई नीतूने सांगितले. पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

अल्पवयीनचा बालिकेवर अत्याचार

नागपूर ०४ सप्टेंबर: एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने परिसरात राहणाऱ्या १५ वर्षीय मुलीला प्रेमात अडकवले. तो सतत तिचे शारीरिक शोषण करीत होता. मात्र पीडितेला गर्भधारणा झाल्याने ही घटना उघडकीस आली आणि जरीपटका पोलिसात तक्रार करण्यात आली. सप्टेंबर २०२१ मध्ये पीडितेची अल्पवयीनशी मैत्री झाली आणि लवकरच त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपी पीडितेला अंबाझरी ठाण्यांतर्गत राहणाऱ्या मित्राच्या घरी घेऊन गेला. तेथे तिच्यावर अत्याचार केला. ज्यावेळी पीडिता घरात एकटी असायची आरोपी तेथे जाऊन तिच्यावर अत्याचार करीत होता. दोघांच्याही कुटुंबीयांना याची माहिती नव्हती. काही दिवसांपूर्वी पीडितेच्या पोटात दुखू लागले. कुटुंबीयांनी तिला उपचारार्थ डॉक्टरकडे नेले असता तपासात ती चार महिन्यांनी गर्भवती असल्याचे समजले. कुटुंबीयांनी विचारपूस केली असता तिने अल्पवयीनचे नाव सांगितले. डॉक्टरने दिलेल्या अहवालावरून पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून अत्याचार, अपहरण आणि पोक्सो ॲक्टच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

अत्याचार प्रकरणात जमशेदपूरचा विद्यार्थी जेरबंद

नागपूर ०४ सप्टेंबर: गेल्या महिन्यात धंतोली ठाण्यात नोंद झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात पोलिसांनी जमशेदपूरच्या एका विद्यार्थ्याला अटक केली आहे. एका ॲपच्या माध्यमातून त्याने तरुणीशी मैत्री गाठली आणि नंतर तिला प्रेमात अडकवले होते. यश नंद ओझा (२४) असे आरोपीचे नाव आहे. तो जमशेदपूरच्या एका महाविद्यालयातून पत्रकारितेचे शिक्षण घेत आहे. जवळपास ४ महिन्यांपूर्वी यशने २३ वर्षीय पीडितेशी क्लब हाऊस नावाच्या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून मैत्री केली. दोघांमध्ये चॅटिंग सुरू झाली. दरम्यान यशने पीडितेसमोर प्रेमाचा प्रस्ताव ठेवला. तिने नकार दिला असता त्याने क्लब हाऊसच्याच काही सदस्य मित्रांना आपले आई-वडील बनवून पीडितेशी बोलायला लावले. त्यांनी पीडितेला यश मोठ्या न्यूज चॅनलमध्ये काम करतो आणि व्यावसायी कुटुंबातून असल्याची बतावणी केली. पीडिता त्यांच्या जाळ्यात अडकली. त्यानंतर यश तिला भेटायला नागपुरात आला. यावेळी त्याने जबरीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि परत गेला. त्यानंतरही तो पीडितेला त्रास देत होता. गेल्या महिन्यात यशने तिच्यासोबतचे खासगी क्षणांचे फोटो आणि व्हीडिओ सोशल मीडियावर मित्र आणि नातेवाईकांना पाठविल्याची तिला माहिती मिळाली. पीडितेने धंतोली पोलिसात तक्रार केली. तपासात यशचे खरे नाव आणि पता समोर आला. शुक्रवारी त्याला जमशेदपूर येथून अटक करून नागपुरात आणण्यात आले.

लग्नासाठी अल्पवयीन प्रियकर घरातून पळाले, टीटीईच्या मदतीने जीआरपीकडे सुपूर्द

नागपूर ०४ सप्टेंबर: एकमेकांच्या प्रेमात आंधळे झालेले अल्पवयीन प्रियकर जोडपे लग्न करण्यासाठी घरातून पळून गेले, मात्र ट्रेनमध्ये प्रवास करणाऱ्या इतर प्रवाशांना संशय आला. त्यानंतर टीटीईच्या मदतीने या दोघांना नागपूर स्थानकावर उतरवून लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. मुलीच्या पालकांनी पुण्यातील हिंजवाडी पोलिस ठाण्यात मुलगी हरविल्याची तक्रार दाखल केल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संकेत आणि संगीता (दोन्ही नावे बदलली आहेत) हे उत्तर प्रदेशातील एकाच गावचे रहिवासी आहेत. दोघांची आर्थिक परिस्थिती विशेष नाही. दोघांचे प्रेम होते. दरम्यान, संगीताचे आई-वडील संपूर्ण कुटुंबासह कामाच्या शोधात पुण्यात आले. तर दुसरीकडे संगीता पासून दूर असलेला संकेत आजारी पडला. त्याने संगीताला भेटायला पुण्याला जायचे ठरवले. संकेत आणि संगीता यांची रेल्वे स्थानकावर भेट झाली आणि तेथे त्यांनी लग्न करण्यासाठी उत्तर प्रदेशला पळून जाण्याचा बेत आखला. मात्र ते नागपूरला येणाऱ्या ट्रेनमध्ये बसले. दुसरीकडे, बराच वेळ होऊनही संगीता घरी न परतल्याने तिच्या पालकांनी हिंजवाडी पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली. रेल्वेतून प्रवास करणाऱ्या संकेत आणि संगीता यांच्याबद्दल इतर सहप्रवाशांना संशय आला. त्यांनी आपली शंका टीटीईला सांगितली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून टीटीईने दोघांनाही स्टेशनवर उतरवले. त्यानंतर नागपूर लोहमार्गला माहिती देऊन संकेत आणि संगीता यांना जीआरपीच्या ताब्यात देण्यात आले. पीआय मनिषा काशिद यांच्या सूचनेवरून महिला एएसआय दीपाली खरात व नाजनीन पठाण यांनी दोघांनाही विश्वासात घेऊन चौकशी केली असता हे प्रकरण प्रेमप्रकरण असल्याचे निष्पन्न झाले. तात्काळ संगीताच्या पालकांना फोन करून आपली मुलगी सुखरूप असल्याची माहिती देण्यात आली.

ब्लॅकमेल करून महिला वकिलावर अत्याचार, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नागपूर ०४ सप्टेंबर: वकीलाने ब्लॅकमेल करीत सहकारी महिला वकिलावरच वारंवार अत्याचार केल्याचे खळबळजणक प्रकरण पुढे आले आहे. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी वकीलासह त्याच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कमलेश वाघदरे (४६, रा. सोनेगाव) आणि त्याचा मित्र आदित्य चौधरी अशी आरोपींची नावे सांगण्यात येतात. कमलेश आणि आकारनगर येथील रहिवासी ४६ वर्षीय महिला दोघेही पेशाने वकिल आहेत. दोघेही जिल्हा व सत्र न्यायालयात सराव करतात. यामुळे एकमेकांचे परिचितही आहेत. कमलेश अनेकदा पीडितेच्या घरी जायचा. याच दरम्यान कमलेशने तिचे अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली, असा पीडितेचा आरोप आहे. २४ मार्च २०१४ ते २७ मार्च २०२२ दरम्यान घरी आणि कार्यालयात वारंवार अत्याचार केला.

कमलेशने तिला अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचाही पीडितेचा आरोप आहे. विरोध केल्यास कमलेश जातीवाचक शिवीगाळही करायचा. कमलेशचा मित्र आदित्य यानेही पीडितेच्या घराखाली येऊन तिला शिवीगाळ केली. आदित्यने गुंड आणून तिच्या पतीला मारहाण केली आणि तिच्या मुलीला घरातून पळवून नेण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. तसेच संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी कमलेश आणि आदित्यविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

विजेच्या धक्क्याने मृत्यू

नागपूर ०४ सप्टेंबर: हिटरने पाणी गरम करीत असताना विजेचा जबरदस्त शॉक बसल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. मनीषा राजेश कडू (३४) रा. खैरी गाव असे मृताचे नाव आहे. शनिवारी दुपारी १२.४५ वाजताच्या सुमारास मनीषा घरी हिटरने पाणी गरम करीत होत्या. दरम्यान विजेचा जबरदस्त शॉक बसल्याने त्या बेशुद्ध होऊन खाली कोसळल्या. कुटुंबीयांनी त्यांना उपचारार्थ कामठी उपजिल्हा रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

एल अँड टी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क
प्लॉट क्र. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर व्ही, सॉल्ट लेक सिटी
कोलकाता 700 091, जिल्हा 24 - परगणाज् नॉर्थ.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय : नागपुर

L&T Financial Services

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी "सार्वजनिक लिलावाद्वारे" "जिथे आहे जसे आहे तत्त्वावर" आणि "ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्त्वावर" खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	तारा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 25.08.2022 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. गुप्ता ट्रेडर्स 2. ए वन फायनान्स 3. न्यू ओ वन फायनान्स 4. राजेंद्र रतनलाल गुप्ता 5. कपिल राजेंद्र गुप्ता 6. सनी राजेंद्र गुप्ता 7. कमलेश राजेंद्र गुप्ता 8. कैलाश द्वारकाधीश जोशी 9. नीलम कैलाश जोशी	मालमत्तेचा पत्ता : अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : प्लॉट क्र. 35, के.एच. 5/6, 6/4, पी.एच.क्र. 7 अधिमापन क्षेत्रफळ 726.0690 चौ.मी. (1357 चौ.फू.) मौजे - तेलंगखेडी, रस्ता क्र. 28 सीटीएस क्र. 11, वॉर्ड क्र. 62, नगरपालिका घर क्र. 39अ/35, मानव मंदिर मागास वर्गीय कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, नागपुर, नागपुर इम्प्रूव्हमेंट ट्रस्टच्या आणि नागपुर महानगरपालिकेच्या सीमेमध्ये, तहसील आणि जिल्हा नागपुर, आरसीसी व जी.एफ. रचनेसोबत, प्लॉटवरील एकूण बांधकाम 87.7520 चौ.मी. आहे पण सदर प्लॉट 572/1900 योजनेखाली येतो म्हणून एकूण बांधलेल्या जागेपैकी मंजुरी फक्त सदर प्लॉटच्या तळमजल्यावरील 53.32 चौ.मी. करिता प्राप्त, जो पुढीलप्रमाणे सीमाबद्ध आहे : पूर्व : रस्ता आणि प्लॉट क्र. 54 पश्चिम : प्लॉट क्र. 36 उत्तर : प्लॉट क्र. 53 दक्षिण : रस्ता आणि प्लॉट क्र. 34	NGPHL18000093	3 एप्रिल 2022	रु. 4,68,523.7/-	रु. 61,70,939.78/-	रु. 48,65,237/-	10/10/2022	17/10/2022

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. ही लिलाव विक्री अधिकृत अधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक लिलावाच्या पद्धतीच्या मदतीने सरफेसी कायद्याच्या तरतुदींखाली करण्यात येत आहे.
2. हा सार्वजनिक लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता "जशी आहे जिथे आहे तत्त्वावर" आणि "जशी आहे ज्या स्थितीत आहे" त्या तत्त्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 17/10/2022 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 17/10/2022 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 18/10/2022 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कार्यक्षात तरतदींनतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे नाव : ज्ञानेश्वर नारायणराव, संपर्क क्र. 9975402760, एल अँड टी फायनान्स लि., एल अँड टी फायनान्स लि - ऑफिस क्र. 501, 5वा मजला, श्रीराम श्याम टॉवर, सदर, नागपुर - 440001. लिलाबाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा एसएआरएफएईएसआय कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 05.09.2022
ठिकाण: नागपुर

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड